# जाहिरात

## ठाणे महागगरपालिका, ठाणे

## लेखापरिक्षा विभाग

### करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षकांच्या सेवा उपलब्धततेसाठी जाहिरात

लेखापरिक्षा विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे मार्फत सहा महिन्यांचे कालावधीसाठी महापालिका मुख्य लेखापरिक्षक, महालेखाकार व स्थानिक निधी लेखा विभागाने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करण्यासाठी करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षकांच्या सेवा उपलब्ध करणेसाठी इच्छूक व पात्र सेवानिवृत्त लेखापरीक्षकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. विहीत नमुन्यातील अर्ज मुख्य लेखापरिक्षक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, प्रशासकीय भवन, दुसरा मजला, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे यांच्याकडे तसेच ठाणे महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छूकांनी ते परिपूर्ण रित्या भरून दि. ०८/१२/२०१७ पर्यंत लेखापरिक्षा विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे या कार्यालयाकडे पाठवावेत. अर्जाच्या लिफाफ्यावर **करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षक या पदासाठी अर्ज** असे ठळक अक्षरांत नमूद करावे. अर्जासोबत स्वतःचा पत्ता असलेला व त्यावर रु. ५/- चे पोस्ट मुद्रांक चिकटविलेला १५ सें.मी. X १० सें.मी. आकाराचा लिफाफा पाठविण्यात यावा. निवडलेल्या लेखापरीक्षकांना त्यांच्या सेवा लेखापरीक्षणासाठी घेण्यात येत असल्याबाबतची पत्रे पोस्टाने /ई-मेल द्वारे पाठवण्यात येतील.

**१) पदाचे नाव :** करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षक

**२) विभागासाठी आवश्यक लेखापरीक्षकांची संख्या :-** ३

**३) पात्रतेचे निकष :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब (राजपत्रित / अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.

**किंवा**

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागातून वरिष्ठ लेखापरीक्षक / कनिष्ठ लेखापरीक्षक या पदावरुन सेवानिवृत्त झालेले कर्मचारी.

**किंवा**

ठाणे महानगरपालिकेच्या लेखा व लेखापरिक्षा विभागातून लिपीक /लेखापरिक्षक अथवा त्यावरील पदावरुन सेवानिवृत्त झालेले कर्मचारी.

४) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्याचे वय ६५ वर्षाहून अधिक नसावे.

५) स्वेच्छा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांबाबत सेवानिवृत्त झाल्याचा कालावधी ७ वर्षापेक्षा अधिक नसावा.

६) अधिकारी / कर्मचारी शारीरीक दृष्ट्या सक्षम असावा.

७) त्याला शासकीय नियमांची तसेच लेखापरीक्षण विषयक अधिनियम व नियमांची माहिती असावी.

८) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द त्यांच्या शासकीय सेवा कालावधीतील कामकाजाबाबत कोणत्याही प्रकारचे विभागीय चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.

९) करारपद्धतीने निवड करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांनी विहीत नमुन्यातील वचनपत्र भरुन देणे आवश्यक आहे.

**४) मानधन :-**

करार पध्दतीने मानधन तत्वावरील लेखापरीक्षकांना शासन निर्णय क्र. संकिर्ण - २७१५/प्र.क्र. १००/१३ दि.०८/०१/२०१६ नुसार मानधन देण्यात येईल.

मुख्य लेखापरिक्षक
ठाणे महानगरपालिका, ठाणे